**उपमुख्य अभियंता -स्थापत्य (गट-अ)**
**संवर्गात अधिसंख्य (Ad-hoc) पदावर**
**तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती /**
**नेमणूका/बदल्या**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई ४०००५१**
**आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०१९/२९२२ /प्र.७**
**दिनांक :- 30 OCT 2019**

**संदर्भ -** प्राधिकरणाचे आदेश क्र. प्राधि./अधिसंख्य/२०१७/१७९/प्र.७
दि. १२.०१.२०१७

## आ दे श

प्रशासकीय हित लक्षात घेऊन संदर्भिय आदेशान्वये मान्यता दिल्याप्रमाणे निर्मित **उपमुख्य अभियंता (स्थापत्य) [गट-अ]** संवर्गातील अधिसंख्य पदावर सदर आदेशात व खालील नमूद असलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून **कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ)** संवर्गातील **श्री.संजय देवराम महाजन** कार्यकारी अभियंता यांना **उपमुख्य अभियंता-स्थापत्य (गट-अ)** या संवर्गात **रु.१५६००-३९१००** या वेतन बँडमधील ग्रेड पे **रु.७६००/-** या वेतन संरचनेत एतदर्थ, पूर्णपणे तात्पुरत्या स्वरूपात **अधिसंख्य** (Ad-hoc) पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना **उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण** या रिक्त असलेल्या पदावर करण्यांत येत आहे.

२/- सदर पदोन्नती ११ महीने किंवा प्रतिनियुक्तीवरील उपमुख्य अभियंत्याची सेवाप्रत्यावर्तन यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीपर्यंत कार्यरत राहील.

३/- सदर अधिसंख्य पद अन्य विभागात प्रतिनियुक्तीमुळे उपमुख्य अभियंता संवर्गात रिक्त राहणाऱ्या पदाऐवजी निर्मित करण्यात आले आहे. त्यामुळे संदर्भिय आदेशात नमूद प्रमाणे प्रतिनियुक्तीवरील अभियंत्याची सेवा प्रत्यावर्तीत झाल्यास अधिसंख्य पदावर पदोन्नत उपरोक्त नमूद अभियंत्यास पदावनत करण्यात येईल.

४/- अधिकाऱ्यांची तात्पुरत्या एतदर्थ (Adhoc) पध्दतीनुसार पदोन्नतीने केलेल्या नेमणूकीमुळे असल्याने त्यांचा या संवर्गातील कायम पदावर कोणताही हक्क/धारणाधिकार राहणार नाही, या अटीवर करण्यात येत आहे.

५/- अधिसंख्य पदावरील पदोन्नत उपमुख्य अभियंत्याचा सदर पदावरील कालावधी उपमुख्य अभियंता संवर्गात ज्येष्ठतेसाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

६/- अधिसंख्य पदाकरीता बिंदु नामावली लागु राहणार नाही.

७/- सदर पदोन्नतीने पदस्थापना दिलेल्या पदावर अभियंता रुजू न झाल्यास उपमुख्य अभियंता संवर्गातील सेवा प्रवेश नियमातील निकषांची पुर्तता करणाऱ्या व विभागीय पदोन्नती समितीने उपमुख्य अभियंता

संवर्गात पदोन्नतीकरीता पात्र करून निवडसूचीवर घेतलेल्या प्रतिक्षायादीवरील अभियंत्याचा पदोन्नतीकरीता विचार करण्यात येईल.

८/- पदोन्नत होणाऱ्या अभियंत्यास पदोन्नतीपुर्वी वरील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र सादर करावे लागेल.

९/ संबधित पदोन्नत पदधारकास पदोन्नतीनंतर अनुज्ञेय वेतनाबरोबर महागाई भत्ता व अन्य भत्ते नियमानुसार अनुज्ञेय राहतील.

१०/- शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-१०८२/सीआर-११०० [एक ]/ सेवा-३, दिनांक ६/११/१९८४ नुसार संबंधित पदोन्नत पदधारकाने आपल्या वेतन निश्‍चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावयाचा आहे. अन्यथा त्यांची वेतन निश्‍चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन ] नियम १९८१ च्या नियम ११ ची दिनांक ०३.०७.१९९३ अन्वयेची सुधारणा अर्थात महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) (दुसरी सुधारणा) नियम १९९३ नियम ११ (१) मधील तरतुदीनुसार करण्यांत येईल.

११/- हे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून **सात दिवसाच्या आंत** पदोन्नत पदधारक यांनी नवीन न णूकीच्या ठिकाणी रुजू व्हावयाचे आहे. पदस्थापनेच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जा र नाही. त्यांच्या सक्षम अधिका-यांनी स्थानिक पर्यायी व्यवस्था करुन त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे

**१२/- उपरोक्त अधिकाऱ्यांनी दि.३१/३/२०१९ रोजीचे विहित विवरणपत्रात मत्ता व दायित्वे भरुन दिल्याची खात्री करुन घेतल्याखेरीज संबंधित अधिकाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश हस्तांतरीत करण्यात येऊ नयेत. तसेच आदेश हस्तांतरीत करण्यापूर्वी सदर अधिकाऱ्यांनी मत्ता व दायित्वे सादर केल्याचा तसेच वर नमूद अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमी पत्र सादर केल्याबाबतचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा.**

सदर रहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा.**
**यांचे मान्यतेने.**

**(प्रसाद उकर्डे)**
**सचिव / प्राधिकरण**

**प्रति,**
**श्री. संजय देवराम महाजन,**
**कार्यकारी अभियंता**
(मुख्य अधिकारी / एसआरए/प्रा. यांचे मार्फ़त)

**प्रत सस्नेह अग्रेषित :**

१ मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२ मुख्य अधिकारी / मुं.गृ.नि. व क्षे.वि.मं./मुं .इ.दु.व पु.मंडळ
३ मुख्य अभियंता/प्रा. (१/२/३)
४ वित्त नियंत्रक/प्रा.

५ उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
६ मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.
७ मुख्य अधिकारी मुं.झो.सु.मं./कोंकण/पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती मंडळ
८ उपमुख्य अभियंता /मुं झो सु मंडळ

**<u>प्रत माहितीसाठी :-</u>**

१. मुख्य लेखाधिकारी, मुं.इ.दु. व पु. मंडळ
२. लेखाधिकारी / प्रा.
३. प्रशासकीय अधिकारी -१,२/ प्रा./मुं.इ.दु. व पु. मंडळ

**<u>प्रत माहितीसाठी :-</u>**

मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक

प्रत - प्रशा-६/८/९/१०/११/१२/१३/१५/प्रा.